महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे Rs.2/- कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शनिवार ■ १७ मे २०२५ ■ वर्ष - सहावे ■ अंक ३१८ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पत्रकार हवे आहेत**

दैंनिक ठाणे जीवनदीप वार्ता करिता खालील ठिकाणी पत्रकार नियुक्त करणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा

• मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर • बोईसर • वसई • विरार • भाईंदर • पनवेल • वाडा • बदलापूर • शहापूर • आसनगाव • भिवंडी • कसारा • कर्जत • सरळगाव • म्हसा • धसई • अंबरनाथ • विठ्ठलवाडी • उल्हासनगर • टिटवाळा • शहाड • कोनगाव • आंबिवली • दिवा • कळवा

दैनिक 'ठाणे जीवनदीप वार्ता'
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.)
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१
E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com

# 'विरोधी पक्षात बसायला आमदारांची तयारी नाही' - शरद पवार



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता :** राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटात दोन मतप्रवाह आहे. काही जण सत्तेत अजित पवारांसोबत जाण्यास इच्छुक आहेत, असं काही दिवसांपूर्वी शरद पवार यांनी म्हटलं होतं. तर पत्रकारांसोबत अनौपचारिक बोलताना, उद्या दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्या तर आश्चर्य वाटू नये, असंही शरद पवार यांनी म्हटलं होतं. त्यामुळे दोन्ही राष्ट्रवादी एकत्र होणार या चर्चांना मागील काही दिवसांपासून उधाण आलं आहे.

शरद पवार पक्षाच्या आमदारांना सत्तेत जायचे वेध लागले आहेत. विरोधात बसण्याची आमदारांची तयारी नाही. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या भेटीत शरद पवारांनी ही खंत बोलून दाखवली. त्यामुळे शरद पवारांचे आमदार सत्तेत जाण्यास आतुर झालेले असताना महाविकास आघाडीचं भवितव्य काय असा प्रश्न आहे, उपस्थित होतो आहे.

**अजित पवारांना काय म्हटलं होतं?**

दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष विलिकरणाची सध्या तरी चर्चा नाहीत. विलिनीकरणाचा कोणताही प्रस्ताव नाही. त्यामुळे हा चर्चेचा विषय नाही, असं अजित पवारांनी माध्यमांशी बोलताना स्पष्ट केलं होतं. शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला गळती लागण्याची शक्यता असल्यानं या चर्चा होत आहेत. आगामी काळातील गळती थांबवण्याच्या अनुषंगाने ते (शरद पवार) या प्रकारचं वक्तव्य करत असतील, असंही अजित पवारांनी म्हटलं होतं.

महाविकास आघाडी वाचवण्यासाठी काँग्रेसने प्रयत्न सुरु केले आहेत. शरद पवारांच्या भेटीनंतर नंतर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ मातोश्रीवर उद्धव ठाकरेंची भेट घेणार आहेत. प्रदेशाध्यक्ष झाल्यानंतर पहिल्यांदाच हर्षवर्धन सपकाळ आणि उद्धव ठाकरेंची भेट होणार आहे. महाविकास आघाडीच्या भवितव्यासाठी काँग्रेस प्रदेशाध्यक्षांनी दोन्ही नेत्यांची भेट ठरवली. मात्र आगामी महापालिका निवडणुकीत महाविकास आघाडीची पकड सैल होताना दिसत आहे. महापालिका निवडणुकीत तिनही पक्ष काय करणार याकरिता मविआ नेत्यांच्या भेटीला महत्व प्राप्त झालं आहे.

# कार्यालयीन सुधारणा अभियानात कुळगांव-बदलापूर नगरपरिषद प्रथम

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता :** मा. मुख्यमंत्री , महाराष्ट्र राज्य यांनी जाहीर केलेनुसार १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा अभियानात कुळगांव-बदलापूर नगरपरिषद प्रथम" राज्य शासनाच्या १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमात, प्रत्येक महसूली विभागातील उत्कृष्ट तालुका कार्यालयांची निवड करण्यात आली.संपूर्ण विभागातील सर्वोत्तम तालुका कार्यालयांमध्ये कुळगांव-बदलापूर नगरपरिषदेने पटकावलं पहिलं क्रमांकाचं स्थान — या यशामागे आहे नगरपरिषदेच्या सर्व कर्मचाऱ्यांची एकजुट, अथक मेहनत आणि सेवाभाव, तसेच मुख्याधिकारी तथा प्रशासक मा. मारुती गायकवाड सरांचे योग्य मार्गदर्शन आणि प्रभावी नेतृत्व, ज्यामुळे हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.हे यश आहे चांगल्या प्रशासनाचं, कार्यक्षमतेचं आणि जनतेच्या विश्वासाचं. कुळगांव-बदलापूर नगरपरिषद अशाच ठाम पावलांनी प्रगतीच्या वाटेवर पुढे जात राहील!

# कृषी विभागाची जिल्हास्तरीय खरीप हंगाम पूर्व आढावा बैठक संपन्न



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** मा.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समिती सभागृह येथे संपन्न झाली.

यावेळी खासदार नरेश मस्के, खासदार सुरेश म्हात्रे, आमदार किसन कथोरे, ज्ञानेश्वर म्हात्रे, राजेश मोरे, सुलभा गायकवाड, शांताराम मोरे, डॉ.बालाजी किणीकर या मान्यवर लोकप्रतिनिधीसह जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी छायादेवी शिसोदे, मीरा-भाईंदर पोलीस आयुक्त मधुकर पांडे, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने, उपजिल्हाधिकारी सर्जेराव मस्के पाटील, जिल्हा पुरवठा अधिकारी वैशाली माने, जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी, कोकण विभागीय कृषी सह संचालक बालाजी ताटे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रामेश्वर पाचे, पोलीस उपायुक्त रश्मी नांदेडकर, पंकज शिरसाठ, तहसिलदार सचिन चौधर, रेवण लेंभे आणि विविध शासकीय विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.




# मुरबाड बस स्थानकाचे काम संथगतीने



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

विहित मुदतीत काम पुर्ण होईल की नाही याबद्दल मुरबाड करांना शंका!मुरबाड-प्रतिनिधी (दिलीप पवार)मुरबाड विधानसभा मतदार संघाचे कार्यक्षम आमदार किसन कथोरे यांनी मुरबाड बस स्थानकाच्या नूतनीकरणासाठी राज्य शासनाकडून 13 कोटी रुपये निधी मंजुर करून घेतला आहे. या नविन कामाचे भूमिपूजन ही मोठ्या जल्लोषात करण्यात आले होते.या नविन इमारतीच्या प्रत्यक्षात कामाला 3 महिन्यापूर्वी सुरुवात देखील झाली होती. यामध्ये जुनी इमारत निष्कासित करने व नविन इमारतीच्या कामाला सुरुवात करण्यासाठी खूप अवधी गेला असून सध्य स्थितीत नवीन कामाचे फक्त फुटिंगचे काम झाल्याचे दिसत आहे. गेल्या 3 महिन्यात बरेचसे काम होणे अपेक्षित असताना प्रत्यक्ष काम मात्र अत्यंत संथ गतिने सुरु आहे. नविन इमारतीचे काम सुरु केल्याने मुरबाड तालुक्यातील ग्रामीण भागातील प्रवाशांसाठी तसेच शहापूर,बदलापूरकडे जाणार्या प्रवाशांना उभे राहण्यासाठी मुरबाड बस आगाराने तात्पुरता पत्र्याचे शेड उभारले आहेत परंतु हे शेड प्रवाशांच्या संख्येच्या तुलनेत अपुरे पडत असून सध्या पावसाने जोरदार सुरूवात देखील केली आहे. पुर्ण पावसाळा प्रवाशांना याच कमी जागेत तासन तास उभे राहून प्रवास करावा लागत आहे. कल्याण -ठाणे , मुंबई कडे प्रवास करणार्या प्रवाशांचे तर मोठे हाल होत असून त्यांना धड उभे राहण्यासाठी पुरेसा शेडहि मुरबाड आगाराला उभारता आले नाही. संबंधित ठेकेदाराने घेतलेले काम विहित वेळेत पुर्ण करावे व मुरबाडकरांचे होणारि परवड थांबवावी अशी मागणी सध्या समस्त मुरबाडकर व्यक्त करत आहेत.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते कल्याण - डोंबिवलीतील स्वच्छता अभियानाचा उद्या शुभारंभ

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महापालिकेच्या माध्यमातून शहरात कचरा संकलन वाहतूक, रस्ते सफाई आणि शहर स्वच्छतेच्या कामाचा शुभारंभ करण्यात येत आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते या अभियानाचा रविवार, १८ मे रोजी डोंबिवली पूर्वेतील सावळाराम महाराज क्रीडा संकुलाच्या मैदानात सायंकाळी ४.३० वाजता या प्रकल्पाचे भूमिपूजन संपन्न होणार आहे. यामध्ये घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या ७ प्रभागातील कचरा संकलन व वाहतुक याचबरोबर रस्ते सफाईकरीता अत्याधुनिक यंत्रणांचा वापर करून शहर स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी हे अभियान राबविण्यात यावे यासाठी पुढाकार घेतला होता.

राज्याचे उपमुख्यमंत्री आणि शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या पुढाकाराने आणि आमदार रविंद्र चव्हाण यांच्या सहकार्याने कल्याण लोकसभा मतदारसंघात विविध महत्वाकांक्षी प्रकल्प मार्गी लागले आहेत. यामध्ये प्रामुख्याने विविध शहरातील कचऱ्याची समस्या लक्षात घेऊन स्थानिक पातळीवर घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारण्यात खासदार डॉ.शिंदे यांनी प्राधान्य दिले आहे. अंबरनाथ आणि बदलापूर शहराचा संयुक्त घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प हाही याचा एक भाग आहे. याच पद्धतीने कल्याण - डोंबिवली महापालिका क्षेत्रात अत्याधुनिक यंत्रणांचा वापर करून शहर स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे. यासाठी विशिष्ट यंत्रणा देखील कार्यान्वित करण्यात येणार आहे.

कल्याण डोंबिवली महापालिकेच्या माध्यमातून शहरात कचरा संकलन वाहतूक, रस्ते सफाई आणि शहर स्वच्छतेच्या कामाच्या माध्यमातून प्रभागातील कामकाजावर नियंत्रण ठेवण्याकरीता २४७ कमांड कंट्रोल सेंटर उभारण्यात येणार आहेत. तर नागरिकांमार्फत प्राप्त तक्रारींचे निवारण करण्याकरीता स्वतंत्र मनुष्यबळ व यंत्रणा उभी केली जाणार असून २४ तास कार्यरत कक्ष उभारण्यात येणार आहेत. ५ ठिकाणी वेस्ट टू वेल्थ सेंटर्स उभारणी करण्यासमवेतच प्राथमिक कचरा संकलनाकरीता पर्यावरण पुरक बॅटरीवर चालणारी वाहने व चार्जिंग स्टेशनसह अत्याधुनिक पाकींग व्यवस्था उभारली जाणार आहे.

## सुरक्षित प्रवासाबरोबरच वक्तशीर सेवेसाठी

# 'एसटी'च्या 'स्मार्ट बसेस



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई :** भविष्यात 'एसटी'च्या प्रवाशांना सुरक्षित प्रवासा बरोबरच वक्तशीर बससेवा पुरवण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज असलेल्या 'एसटी'च्या 'स्मार्ट बसेस' घेण्यात येणार आहेत, अशी माहिती परिवहनमंत्री तथा 'एसटी महामंडळा'चे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

नव्या तीन हजार बसेस खरेदीच्या अनुषंगाने बोलावलेल्या बसबांधणी कंपन्यांच्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला 'एसटी महामंडळा'चे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर आणि संबंधित खाते प्रमुखांसह बसबांधणी कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मंत्री सरनाईक म्हणाले की, "नवीन लालपरीसह येणाऱ्या सर्व बसेसमध्ये 'एआय' तंत्रज्ञानावर आधारित कॅमेरे, 'जीपीएस' तंत्रज्ञान एलईडी टीव्ही, वाय फाय, चालक ब्रेथ नालाईज यंत्रणा, याबरोबरच चोरी-प्रतिबंध तंत्रज्ञानवर आधारित 'बस लॉक सिस्टम' असे आधुनिक तंत्रज्ञान एकात्मिक पद्धतीने लावण्यात येणार असून या बसेस प्रवाशांसाठी अधिक सुरक्षित आणि आरामदायी असतील.

# कार्यालयीन सुधारणा अभियानात ठाणे जिल्ह्याचा डंका !

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

मुख्यमंत्री , महाराष्ट्र राज्य यांनी जाहीर केलेनुसार १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा अभियानात ठाणे जिल्ह्याने आपला दर्जा राखत उत्कृष्ट कामगिरी करून दाखविली आहे. जिल्ह्यातील विविध विभागांनी प्रथम आणि द्वितीय पुरस्कार प्राप्त करत मुख्यमंत्र्यांचे १०० दिवसीय कार्यालयीन सुधारणा अभियान यशस्वी करून दाखवले आहे.

- उपविभागीय अधिकारी, भिवंडी, द्वितीय
- तहसिलदार शहापूर, तृतीय
- दुय्यम निबंधक उल्हासनगर 3 - प्रथम
- गटविकास अधिकारी, शहापूर - द्वितीय
- तालुका वैद्यकीय अधिकारी, भिवंडी तृतीय
- पोलीस निरीक्षक, मुरबाड, - प्रथम
- वनपरिक्षेत्र अधिकारी, शहापूर - द्वितीय
- बालविकास प्रकल्प अधिकारी - भिवंडी, प्रथम
- बाल संरक्षण अधिकारी, भिवंडी - प्रथम
- उपअभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, शहापूर - तृतीय
- पशुधन विकास अधिकारी, शहापूर - तृतीय
- मुख्याधिकारी, नगरपरिषद कुळगाव-बदलापूर - प्रथम
- उपअभियंता, महावितरण, कल्याण - द्वितीय
- सहाय्यक निबंधक (सहकारी संस्था), कल्याण प्रथम
- उपकोषागार अधिकारी, शहापूर प्रथम
- तालुका क्रीडा अधिकारी, ठाणे - द्वितीय
- वैद्यकीय अधीक्षक, भिवंडी - द्वितीय
- गटशिक्षणाधिकारी, कल्याण - प्रथम
- उपविभागीय पोलीस अधिकारी, गणेशपुरी - द्वितीय









## गीतासार



### अध्याय ११
### विश्वरूपदर्शनयोगः

अनेकबाहूदरवक्त्रनेत्रं पश्यामि त्वां सर्वतोऽनन्तरूपम् । नान्तं न मध्यं न पुनस्तवादिं पश्यामि विश्वेश्वर विश्वरूप ॥ ११-१६ ॥

हे संपूर्ण विश्वाचे स्वामी, मी आपल्याला अनेक बाहू, पोटे, तोंडे आणि डोळे असलेले, तसेच सर्व बाजूंनी अनंत रूपे असलेले पाहात आहे. हे विश्वरूपा, मला आपला ना अंत दिसत, ना मध्य दिसत, ना आरंभ ॥ ११-१६ ॥

किरीटिनं गदिनं चक्रिणं च तेजोराशिं सर्वतो दीप्तिमन्तम् । पश्यामि त्वां दुर्निरीक्ष्यं समन्ताद्दीप्तानलार्कद्युतिमप्रमेयम् ॥ ११-१७ ॥

मी आपल्याला मुकुट घातलेले, गदा व चक्र धारण केलेले, सर्व बाजूंनी प्रकाशमान तेजाचा समूह असे, प्रज्वलित अग्नी व सूर्य यांच्याप्रमाणे तेजाने युक्त, पाहण्यास अतिशय कठीण आणि सर्व दृष्टींनी अमर्याद असे पाहात आहे. ॥ ११-१७ ॥

त्वमक्षरं परमं वेदितव्यं त्वमस्य विश्वस्य परं निधानम् । त्वमव्ययः शाश्वतधर्मगोप्ता सनातनस्त्वं पुरुषो मतो मे ॥ ११-१८ ॥

आपणच जाणण्याजोगे परब्रह्म परमात्मा आहात. आपणच या जगाचे परम आधार आहात. आपणच अनादी धर्माचे रक्षक आहात आणि आपणच अविनाशी सनातन पुरुष आहात, असे मला वाटते. ॥ ११-१८ ॥

अनादिमध्यान्त मनन्तवीर्य मनन्तबाहुं शशिसूर्यनेत्रम् । पश्यामि त्वां दीप्तहुताशवक्त्रं स्वतेजसा विश्वमिदं तपन्तम् ॥ ११-१९ ॥

आपण आदी, मध्य आणि अंत नसलेले, अनंत सामर्थ्याने युक्त, अनंत बाहू असलेले, चंद्र व सूर्य हे ज्यांचे नेत्र आहेत, पेटलेल्या अग्नीसारखे ज्यांचे मुख आहे आणि आपल्या तेजाने या जगाला तापविणारे, असे आहात, असे मला दिसते. ॥ ११-१९ ॥

द्यावापृथिव्योरिदमन्तरं हि व्याप्तं त्वयैकेन दिशश्च सर्वाः । दृष्ट्वाद्भुतं रूपमुग्रं तवेदं लोकत्रयं प्रव्यथितं महात्मन ॥ ११-२० ॥

हे महात्मन्, हे स्वर्ग आणि पृथ्वी यांच्यामधील आकाश आणि सर्व दिशा फक्त आपण एकट्यानेच व्यापून टाकल्या आहेत. आपले हे अलौकिक आणि भयंकर रूप पाहून तिन्ही लोक अत्यंत भयभीत झाले आहेत. ॥ ११-२० ॥

## रेसिपी
### ओल्या काजूची उसळ



साहित्य : ताजे काजू - २ वाटी किसलेला नारळ कोकम - अर्धी वाटी हिरवी मिरची - ३ ते ४ चिरलेली कोथिंबीर - २ चमचे साखर जिरे पावडर - पाव चमचा तेल मोहरी - पाव चमचा हळद - अर्धा चमचा हिंग - चिमूटभर कढीपत्ता - ४ ते ५ मीठ दूध - पाव वाटी

कृती: काजू ५ ते ६ तास पाण्यात भिजत ठेवा आणि सोलून घ्या. एका पॅनमध्ये २ कप पाणी, दूध टाकून एक उकळी आणा. मिश्रणाला उकळी आली की, त्यात काजू घाला आणि शिजवून घ्यावेत. काजू शिजले की एका प्लेटमध्ये काढून ठेवा. यानंतर पॅनमध्ये तेल गरम करा. तेल गरम झाले की, मोहरी, जिरे, हिंग, कढीपत्ता, हिरव्या मिरच्या घाला आणि परतून घ्यावे. यात शिजवलेले काजू घाला आणि २ ते ३ मिनिटे परतून घ्यावेत. तुम्ही उसळीमध्ये हिरव्या मिरच्यांऐवजी लाल तिखट वापरू शकता. तयार मिश्रणात किसलेला खोबरं आणि गरजेनुसार पाणी घाला. यानंतर चवीपुरते मीठ, कोकम घालून मिश्रणाला एक उकळी घाला. सर्वात शेवटी चिरलेली कोथिंबीर घाला. अशा पद्धतीने चविष्ट ताज्या काजूची उसळ तयार झाली आहे.

# महाराष्ट्र रेडिओलॉजी संघटनेचाही तुर्की, अझरबैजानसह चीन पर्यटनावर बहिष्कार

## संघटनेचे अध्यक्ष डॉ. प्रशांत पाटील यांनी प्रसिद्धी पत्रक काढत दिली माहिती

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : पहलगाम अतिरेकी हल्ल्यानंतर भारताच्या लष्करी कारवाईदरम्यान पाकिस्तानला मदत करणाऱ्या तुर्की, अझर बैजान आणि चीनविरोधात देशभरात संतापाची लाट उसळली आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील रेडिओलॉजिस्ट डॉक्टरांची प्रमूख संघटना असलेल्या महाराष्ट्र राज्य रेडिओलॉजिस्ट असोसिएशननेही यापुढे तुर्की, अझरबैजानसह चीनमधील पर्यटनावर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला आहे. संघटनेचे अध्यक्ष डॉ. प्रशांत पाटील यांनी यासंदर्भात पत्रक काढून ही माहिती दिली आहे.

गेल्या महिन्यात 22 एप्रिल रोजी काश्मीरमधील पहलगाम येथील पर्यटकांवर अतिरेक्यांनी भ्याड हल्ला केला. ज्याच्या प्रत्युत्तरादाखल भारतीय लष्कराकडून ऑपरेशन सिंदूर ही मोहीम राबविण्यात आली. ज्यामध्ये भारतीय लष्कराने पाकिस्तानी लष्कराचे अक्षरशः कंबरडे मोडून काढले. यावेळी झालेल्या युद्धसदृश्य परिस्थितीदरम्यान तुर्कीने पाकिस्तानला लष्करी सामग्री पाठवत आपला पाठिंबा जाहीर केल्याचे समोर आले आहे. तुर्की सोबतच अझर बैजान आणि चीननेही पाकिस्तानला आपला पाठिंबा जाहीर केल्याने भारतीय नागरिकांमध्ये या तिन्ही देशांविरोधात संतापाची लाट उसळली आहे. विशेषतः सोशल मीडियावर त्याचे तीव्र पडसाद उमटत असून या तिन्ही देशांवरील पर्यटनावर बहिष्कार घालण्याचे आवाहन सर्व भारतीयांना करण्यात येत आहे. आणि या आवाहनाला भारतीय पर्यटकांकडूनही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून ट्रॅव्हल कंपनीसह हजारो पर्यटकांनी या देशातील आपले बुकिंग रद्द केले आहेत.

यामध्ये आता महाराष्ट्रातील डॉक्टरांची एक प्रमुख संघटना असलेल्या महाराष्ट्र राज्य रेडिओलॉजी संघटनेनेही आपली भूमिका स्पष्ट करत या तिन्ही देशांवरील पर्यटनावर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला आहे. आताची वेळ ही आपल्या देशासोबत आणि देशाच्या लष्कराच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहण्याची आहे. या दृष्टिकोनातूनच आमच्या संघटनेने हा निर्णय घेतला असून इतर नागरिकांनीही या तिन्ही देशांवर बहिष्कार घालण्याचे आवाहन केल्याची माहिती महाराष्ट्र रेडिओलॉजी संघटनेचे अध्यक्ष डॉ. प्रशांत पाटील यांनी केले आहे.

# मान्सूनपूर्व कामे ३१ मे पर्यंत पूर्ण होणार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पालघर : पालघर जिल्ह्याच्या विविध भागांत मागील आठवड्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे विद्युत खांबांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. त्यामुळे विद्युत खांबे पूर्ववत करण्यात अधिक वेळ गेल्याने महावितरणच्या मान्सूनपूर्व कामांना विलंब झाला आहे. ही कामे ३१ मेपर्यंत पूर्ण होणार असल्याचे महावितरण विभागाकडून सांगण्यात येत आहे. पावसाळयादरम्यान वीजपुरवठा सुरळीत राहावा तसेच विजेच्या तारा व खांब पडून कोणताही अपघात होऊ नये यादृष्टीने महावितरण विभागाकडून मान्सूनपूर्वी देखभाल दुरुस्ती केली जात आहे. ३१ मे पूर्वीच सर्व कामे पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र जिल्ह्यात अनेक ठिकाणी अवकाळी पाऊस झाल्याने अनेक भागात विद्युत खांब, विद्युत तारा, विद्युत रोहित्र नादुरुस्त झाले होते. त्यामुळे त्या खांबांना व विद्युत तारांना पूर्ववत करण्याच्या कामांमध्ये अधिक वेळ गेल्याने मान्सूनपूर्व कामांना उशीर झाला आहे. महावितरण विभागाकडून वाकलेल्या तसेच वीज वाहिन्यांना स्पर्श करणाऱ्या धोकादायक झाडांच्या फांद्या छाटणी करणे, विद्युत खांबांवरील वेलींचा अडथळा दूर करणे, विद्युत रोहित्रांचे, खांबांचे, उपकेंद्रातील उपकरणांचे पूर्ण अर्थिंग तपासणे व तुटलेल्या अर्थवायर पूर्ववत करणे, जीर्ण व खराब पोल बदलण्याचे काम महावितरण कडून हाती घेण्यात आले आहे.

# डोंबिवलीत फेरीवाल्यांचे धरणे आंदोलन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



डोंबिवली : कष्टकरी हॉकर्स व भाजी विक्रेता युनियन (डोंबिवली) आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हातगाडी, पथारी असोसिएशन महाराष्ट्र राज्य माध्यमातून शुक्रवारी 16 तारखेला पूर्वेकडील इंदिरा चौकात धरणे आंदोलन करण्यात आले. पार्किंग फलक हटाव फेरीवाला बचाव या मागणीकरता फेरीवाल्यांनी आंदोलन केले.

रस्त्यावरती पार्किंगची बोर्ड लावले तर गाड्या पार्किंग होणार मग फेरीवाले जाणार कुठे? असा प्रश्न आंदोलनकर्त्यांनी उपस्थित केला आहे. डोंबिवली पश्चिमेतील घनश्याम गुप्ते रोड वरील पार्किंग फलक पी वन, पी टू ची अधिसूचना सन २०१७ रद्द झाली पाहिजे, ज्या ठिकाणी फेरीवाले बसत नाहीत त्या ठिकाणी पार्किंगचे फलक लावल्यास आमचा विरोध नाही. पथविक्रेता उपजीविकेचे संरक्षण व पथविक्रीचे विनियमन अधिनियम २०१४ फेरीवाल्याच्या असलेल्या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी झाली पाहिजे. या मागण्या असल्याचे यावेळी कष्टकरी हॉकर्स व भाजी विक्रेता युनियन (डोंबिवली)चे अध्यक्ष बबन कांबळे यांनी सांगितले. आंदोलनात अध्यक्ष बबन कांबळे, फेरीवाला महिला कमिटी आशा मगरे, रेश्मा कुरेशी, दिपक भालेराव, अभयलाल दुबे, राजू गुप्ता, नेईम खान, अष्टपाल कांबळे, सुनील पाचपुंजे आदी उपस्थित होते.

## मुरबाडमध्ये पावसाळ्याआधीच
# शेतीच्या कामांची लगबग सुरू

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



मुरबाड : मुरबाड तालुक्यातील ग्रामीण तसेच आदिवासी पट्ट्यात व मुरबाड शहर परिसरात ६ मे२०२५ पासून ते १६ मे पर्यंत वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस बरसत आहे. शेतकरी वर्गाने पावसाळ्या आधीच शेतीच्या कामांना सुरूवात केल्याची चित्र दिसून येत आहे. कारण जून महिन्यात पडणारा पाऊस आता मे महिन्यात पाऊस पडत आहे त्यामुळे शेतकरी वर्ग आपापल्या जमिनीची मशागत ट्रॅक्टर व जेसेबी द्वारे करताना दिसत आहे. परंतु हा मे महिन्यात पडणारा अवकाळी पाऊस हा शेतकरी वर्गांना जूनमध्ये भात पेरणी हंगामात दगा देतो की काय अशी चर्चा वयोवृद्ध शेतकरी करताना दिसत आहेत. त्यामुळे ऐन जून महिन्याऐवजी मे महिन्यातच पावसाळा सुरू झाल्या सारख वाटत आहे. कारण मे महिन्यासारख्या कडक उन्हाळयात पाऊस कदाचित एकदा किंवा दोनदा पडतो, परंतु यंदा मे महिन्यात दहा ते अकरा दिवस पाऊस पडताना दिसत आहे त्यामुळे पडत असलेल्या पावसामुळे रानमालावर गवत उगवू लागले आहे. त्यामुळे जून महिन्यात पाऊस कसा पडणार या भीतीपोटी शेतकरी वर्ग हवालदिल झाल्याचे चित्र दिसून येत आहे. संध्याकाळी पडणाऱ्या पावसामुळे काही प्रमाणात हवेतील गारवा जाणवतो परंतु सकाळीव दुपारी मात्र मोठ्या प्रमाणात उष्णता जाणवते.

# बालक मंदिर शाळेचे घवघवीत यश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता




कल्याण : नुकतेच एसएससी निकाल जाहीर झाले आहेत आणि बालक मंदिर संस्थेच्या कॅप्टन रवींद्र माधव ओक हायस्कूल (मराठी माध्यम) आणि इंग्रजी माध्यमाची माध्यमिक शाळा यांनी संयुक्तपणे शालांत परीक्षेत उल्लेखनीय छाप पाडली आहे. याचे श्रेय तीन वर्षांपूर्वी इयत्ता ८वीच्या विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आलेल्या नाविन्यपूर्ण सुपर-४० (सुपर फोर्टी) उपक्रमाला जाते.

या वर्षीच्या सुपर-४० उपक्रम पूर्ण करणाऱ्या १०वीच्या विद्यार्थ्यांच्या बॅचने कोणत्याही बाह्य शिकवणी किंवा कोचिंग क्लासेसशिवाय उत्कृष्ट निकाल दिले आहेत. या कार्यक्रमाच्या अनोख्या दृष्टिकोनात शाळेतील शिक्षकांचे अध्यापन, विषय तज्ज्ञ अभ्यागतांचे मार्गदर्शन, योग, ध्यान, प्रेरक व्याख्याने आणि विद्यार्थी आणि पालकांसाठी समुपदेशन सत्रे यांचा समावेश आहे. या उपक्रमांतर्गत १५ विद्यार्थ्यांनी ९०% आणि त्याहून अधिक आणि १५ विद्यार्थ्यांनी ८०% पेक्षा जास्त गुण मिळवले. ही कामगिरी या कार्यक्रमाच्या कठोर परिश्रम, समर्पण, दृढनिश्चय आणि शिस्तीवर भर देण्याचा परिणाम आहे.

सुपर-४० च्या यशाचे श्रेय हे भविष्य वेधी संस्थाचालक, शाळेतील शिक्षक, विद्यार्थ्यांमधील संयम आणि विश्वास आणि मुलांना चांगल्या मूल्यांसह चांगले मानव बनवण्याच्या प्रक्रियेला जाते. या उपक्रमाला पाठिंबा देणारे पालक आणि विद्यार्थ्यांसह संपूर्ण सुपर-४० टीमचे कठोर परिश्रम कौतुकास पात्र आहेत. संस्थेने घेतलेला हा उपक्रम कौतुकास्पद आहे आणि शिक्षणासाठी अशा नाविन्यपूर्ण दृष्टिकोनांना पाठिंबा देणे आणि त्यांचे कौतुक करणे आवश्यक आहे. सुपर-४० कार्यक्रम इतर शाळांसाठी प्रेरणादायी म्हणून काम करतो. योग्य दृष्टिकोन आणि समर्पणाने उत्कृष्टतेची क्षमता अधोरेखित करतो.

# छत्रपती शिवाजी महाराज सर्किट यात्रेत सहभागी व्हा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाचे औचित्य साधुन, भारतीय रेल्वे खानपान व पर्यटन महामंडळाने (IRCTC), आपल्या ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाला उजाळा देण्यासाठी आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनगौरवाचा अनुभव देण्यासाठी एक विशेष पर्यटक ट्रेन 'छत्रपती शिवाजी महाराज सर्किट' ची घोषणा केली आहे. ही यात्रा Bharat Gaurav Tourist ट्रेन अंतर्गत 09 जून 2025 पासून सुरू होत आहे. या यात्रेत सहभागी होण्यासाठी नोंदणी करावी असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ आणि शासन यांच्यावतीने भारत गौरव ट्रेनच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या तेजस्वी इतिहासाशी निगडीत धार्मिक आणि ऐतिहासिक स्थळांना व्यापक प्रसिद्धी मिळवून देण्याचा महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचा आणि शासनाचा मानस आहे. ही केवळ एक यात्रा नसून, आपल्या वैभवशाली परंपरेचा, सांस्कृतिक वारशाचे आणि स्वाभिमानी इतिहासाचा साक्षात अनुभव घेण्याची सुवर्णसंधी आहे. या 5 दिवसांच्या विशेष सहलीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनाशी संबंधित महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थळांना भेट, इतिहासावर आधारीत कार्यक्रम असणार आहेत. आरक्षण व अधिक माहिती साठी *www.irctctourism.com*या संकेत स्थळाला भेट द्यावी.

भारत गौरव ट्रेन ज्या-ज्या ठिकाणी पोहोचेल, त्या ठिकाणी असलेल्या पर्यटन स्थळांची सविस्तर माहीती पर्यटकांना देण्यात येणार आहे.

यात्रेच्या दरम्यान, सर्व प्रवाशांचा अनुभव सुखकर आणि संस्मरणीय व्हावा, यासाठी महामंडळाचे अधिकारी IRCTC च्या समन्वयाने प्रत्येक टप्प्यावर मार्गदर्शन करतील. 5 दिवसांच्या या प्रवासात रेल्वे स्थानकांपासून ते महाराजांच्या गडकिल्ल्यांपर्यंत, प्रत्येक ठिकाणी इतिहासाच्या पाऊलखुणांचा वेध घेत, पर्यटकांना समृद्ध अनुभव दिला जाईल.प्रत्येक गडकोटावर, ऐतिहासिक स्थळी पर्यटन व्यवस्थेचे काटेकोर नियोजन केले जाईल. इतिहासावर आधारित कार्यक्रम, ज्ञानवृद्ध गाईड्स, तसेच स्थानिक शिवप्रेमी संघटनांच्या सहकार्याने याला भावनिक व आध्यात्मिक स्पर्श दिला जाईल.

**पॅकेजमध्ये नसलेल्या सेवाः -**

- साहसी खेळ, बोटिंग इत्यादी.
- खोलीतील सेवांसाठी वेगळी रक्कम आकारली जाईल.
- इतर कोणताही वैयक्तिक खर्च.
- कोणतेही अतिरिक्त पर्यटन स्थळ.

### जिल्हाधिकारी यांचे आवाहन

- सहलीचे नावः छत्रपती शिवाजी महाराज सर्किट
- शुभारंभ दिनांकः ०९ जून २०२५
- कालावधीः ५ दिवस / ६ दिवसांची यात्रा (सकाळी समाप्ती)
- प्रारंभ व समाप्ती स्थानः छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (CSMT), मुंबई
- इतर चढाई/उतराई स्थानकः दादर, ठाणे

**यात्रेचा प्रवासमार्ग -**

मुंबई (CSMT) - रायगड - पुणे - शिवनेरी - भीमा शंकर - प्रतापगड - कोल्हापूर - पन्हाळा - मुंबई.

**प्रमुख स्थळांची माहिती -**

- रायगड किल्ला - छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक येथे झाला व ही राजधानी होती.
- लाल महाल, पुणे - छत्रपती शिवाजी महाराज यांचे बालपण येथे गेले.
- कसबा गणपती व शिवसृष्टी, पुणे - पुण्याचे ग्रामदैवत व छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावरील संग्रहालय.
- शिवनेरी किल्ला - छत्रपती शिवाजी महाराज यांचे जन्मस्थळ.
- भीमाशंकर ज्योतिर्लिंग - १२ ज्योतिर्लिंग पैकी एक प्रमुख धार्मिक स्थळ.
- प्रतापगड किल्ला - अफजल खानावरील ऐतिहासिक विजयाचे ठिकाण.
- कोल्हापूर - महालक्ष्मी मंदिर
- पन्हाळा किल्ला - बाजीप्रभू देशपांडे यांच्या शौर्याचे प्रतीक.

**पॅकेज शुल्क (प्रति व्यक्ती): -**

उपरोक्त सहलासाठी विविध पॅकेजिस तयार करण्यात आली असुन सोयीनुसार इकोनॉमी (SL), कम्फर्ट (३AC), सुपीरियर (२AC) अशा प्रकारच्या सुविधांची निवड करता येणार आहे. सदरच्या पॅकेज बाबत सविस्तर माहीती IRCTC च्या संकेतस्थळावर देण्यात आली आहे.

**पॅकेज मध्ये समाविष्ट सेवाः -**

- भारत गौरव ट्रेनने प्रवास (SL / 3AC / 2AC)
- AC / Non-AC हॉटेलमध्ये राहण्याची व्यवस्था
- सर्व ठिकाणी स्थानिक वाहतूक व गाईड
- ऑनबोर्ड व ऑफबोर्ड शुद्ध शाकाहारी भोजन
- प्रवास विमा, सर्व प्रवेश शुल्क (किल्ले, मंदिरे, रोपवे, शिवसृष्टी इत्यादी)
- सुरक्षा व्यवस्था.


**दैनंदिन टूर कार्यक्रम (संक्षिप्त): -**

- पहिला दिवसः मुंबई - रायगड - पुणे.
- दुसरा दिवसः पुणे (लाल महाल, शिवसृष्टी, कसबा गणपती).
- तिसरा दिवसः शिवनेरी - भीमाशंकर - पुणे.
- चौथा दिवसः प्रतापगड - कोल्हापूर.
- पाचवा दिवसः कोल्हापूर - महालक्ष्मी मंदिर - पन्हाळा किल्ला - मुंबई.
- सहावा दिवसः मुंबई (टूर समाप्त).

# नवी मुंबईत बांग्लादेशींना जन्मदाखला देणाऱ्यास अटक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई: बांगलादेशी नागरिकांना बनावट भारतीय जन्मदाखला बनवून देणाऱ्याला गुन्हे शाखा पोलिसांनी कर्नाटकातून अटक केली आहे. तसेच यापूर्वी अटक झालेल्या बांगलादेशी नागरिकाच्या आई व भावाला भाईंदर येथून अटक करण्यात आली आहे. गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने ५ मे रोजी पनवेलच्या करंजाडे परिसरात छापा टाकून पाच बांगलादेशींना अटक केली होती. त्यावेळी तिघांकडे भारतीय पासपोर्ट सापडला होता. ही बनावट कागदपत्रे तयार करण्यासाठी मदत करणाऱ्या मोहम्मद इस्माईल अमीन्नोदीन येरुलकर (५२) यालाही पोलिसांनी अटक केली. त्याची अधिक चौकशी केली असता या प्रकरणात थेट कर्नाटकमधील धागेदोरे समोर आले. त्यावरून वरिष्ठ निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे यांनी उपनिरीक्षक सरिता गुडे, सहायक निरिक्षक योगेश देशमुख, अलका पाटील, आदींचे पथक केले. त्यांनी कर्नाटकच्या कलबुर्गी परिसरात छापा टाऊन इस्माईल शब्बीर मिया शेख याला अटक केली.



त्याने त्या तीन बांगलादेशींना बनावट जन्मदाखला बनवून दिला होता. त्या आधारे बांगलादेशींनी ते भारतीय असल्याचे सिद्ध करून भारतीय पासपोर्ट बनवला. त्यावरून या दोघांनी इतरही अनेक बांगलादेशींना भारतीय असल्याचा पुरावा बनवून देण्यात मदत केल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. पनवेलच्या कारवाईत अटक करण्यात आलेल्या बांगलादेशी नागरिकाच्या माहितीवरून त्याचा भाऊ राहुल उर्फ मिकाईल गाझी व आई सुफियाबेगम गाझी यांना भाईंदरमधून अटक करण्यात आली आहे. सुफियाबेगम हिच्यावर मुंबई पोलिसांनी २०१२ मध्ये गुन्हा दाखल केला असून न्यायालयाने तिचा अजामीनपात्र वॉरंट देखील काढला होता. मात्र, ती पोलिसांना सापडलेली नव्हती.

# दहावीचा निकाल पाहण्यास गेली परत आलीच नाही

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : दहावीचा निकाल पाहण्यासाठी गेलेली १७ वर्षीय मुलगी बेपत्ता झाल्याची घटना पहली आहे. ओवळा येथील १७ वर्षीय मुलगी १३ में रोजी लोकमान्यनगर येथील शाळेत दहावीचा निकाल पाहण्यासाठी गेली होती. पालकांनी मोबाइलवर फोन केला असता तो बंद होता. ती घरी आली नव्हती. तिचा निकाल तपासला असता ती नापास झाल्याचे समजले, असे तिच्या पालकांनी तक्रारीत म्हटले आहे. तिला फूस लावून नेल्याप्रकरणी कासारवडवली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला.







# डॉ.एन.पी शहा इंग्रजी माध्यम शाळेची विद्यार्थिनी खुशी पाटील ९५.८० % गुण मिळवून मुलींमध्ये प्रथम

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

आगाशी, विरार, अर्नाळा एज्युकेशन सोसायटी संचलितडॉ.एन.पी शहा इंग्रजी माध्यमआगाशी शाळेचा निकाल 100%विरार (स्व.रा.तो)आगाशी, विरार, अर्नाळा एज्युकेशन सोसायटी संचलितडॉ.एन.पी शहा इंग्रजी माध्यमव पुरुषोत्तम पांडुरंग अलीस, विष्णू अण्णा पाटील ज्युनिअर कॉलेज आगाशी चा एस.एस.सी मार्च २०२५ चा शेकडा निकाल 100%लागला असून विद्यालयाची कु.खुशी नरेंद्र पाटील 95.80 % गुण मिळवून शाळेत मुलींमध्ये प्रथम आली आहे. मुलांमध्ये कु.अर्णव सुनील दसादे हा विद्यार्थी 97.40% गुण मिळवून शाळेत मुलांमध्ये



प्रथम आला आहे .परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या 152 विद्यार्थ्यांपैकी 152 विद्यार्थी उत्तीर्ण झाले.त्यापैकी शेकडा ७५ ते ९० च्या दरम्यान 81 विद्यार्थी आहेत. प्रथम श्रेणी 48 विद्यार्थी सेकंड क्लास 22विद्यार्थी व पास क्लास 1 असे एकूण 152 विद्यार्थी पास झाले असल्याची माहिती शाळेच्या मुख्याध्यापिका यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना दिली.

दहावीची परीक्षा ही विद्यार्थ्यांची शैक्षणिक दिशा ठरविणारा महत्त्वाचा टप्पा असतो.आमची कन्या कुमारी खुशी नरेंद्र पाटील हिने शालांत परीक्षेत नेत्र दीपक यश मिळवून प्रगतीची कमान उंचावली आहे. व आमचा विश्वास सार्थ ठरवला आहे. त्यामुळे आमच्या मुलीसाठी ती सांगेल त्या क्षेत्रात आम्ही तिला पाठवून तिची इच्छा पूर्ण करणार, असे खुशीच्या आई-वडिलांनी सांगितले.

# एमसीएमसीआर मध्ये भरती

## अर्ज करण्यास २० मेपर्यंत मुदत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी क्षमता वाढ, सल्लागार सेवा आणि व्यावहारिक संशोधन करण्यासाठी, तसेच महानगरपालिकांचा विकास आराखडा तयार करण्यासाठी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने मुंबई महानगरपालिकेच्या एमसीएमसीआर' या संस्थेला समन्वय (नोडल एजन्सी) म्हणून मान्यता दिली आहे. पवई स्थित महानगरपालिका क्षमता बांधणी आणि संशोधन केंद्रात (एमसीएमसीआर) कंत्राटी तत्वावर काही शैक्षणिक, आस्थापना तसेच तांत्रिक संवर्गातील विविध पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. त्यासाठी अर्ज करण्याची मुदत २० मेपर्यंत वाढवण्यात आली आहे.

महानगरपालिका क्षमता बांधणी आणि संशोधन केंद्र (एमसीएमसीआर) येथे महानगरपालिकेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना, तसेच इतर स्थानिक स्वराज्य संस्थांमधील मनुष्यबळास कौशल्य आणि क्षमता वाढीसाठी प्रशिक्षण दिले जाते. एमसीएमसीआर येथे कंत्राटी तत्वावर काही शैक्षणिक, आस्थापना, तसेच तांत्रिक पदांसाठीची पदभरती जाहिरात २ मे २०२५ रोजी प्रसिद्ध झाली होती.

# खारघरच्या खाणींमधून धुळीचे लोट

## तातडीने कारवाई करावी - पर्यावरणप्रेमींची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** टाटा कॅन्सर रुग्णालयामागील खारघर तुर्भे बोगद्याच्या मार्गावरील टेकड्यांवरील खाणींमधून परिसरात धुळीचे लोट पसरत असून त्यामुळे प्रदुषणाचा धोका वाढत आहे. दरम्यान, यासंदर्भात तातडीने कारवाई करावी, अशी मागणी पर्यावरणप्रेमींनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ई-मेल पाठवून केली आहे. रुग्णालयातील प्रगत कर्करोग उपचार उपकरणांसाठी धूळ घातक असून, रुग्णांसाठी ही बाब अत्यंत गंभीर आहे. यापूर्वी टाटा रुग्णालयाच्या संचालकांनी यासंदर्भात सरकारकडे तक्रार केली होती, त्यानंतर काही काळ खाणी बंद झाल्या होत्या.

मात्र आता पुन्हा खाणींमध्ये स्फोट करण्यात येत असून परिसरात धुळीचे लोट पसरत आहेत, अशी माहिती खारघर हिल अँड वेटलँड फोरमच्या ज्योती नाडकर्णी यांनी दिली. याचबरोबर या खाणींमुळे वन विभाग विकसित करीत असलेल्या पांडवकडा धबधब्यालाही धोका निर्माण झाला असून, खारघर-तुर्भे लिंक रोडसाठी बांधण्यात येत असलेला बोगदाही कमकुवत होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे.

दरम्यान, सर्वोत्तम शहर म्हणून नवी मुंबई शहराला पसंती दिली जात आहे. त्यामुळे तेथे झपाट्याने विकास होत असून महामुंबई उदयास येत आहे. असे असले तरी दुसरीकडे या शहरात दिवसेंदिवस अतिखराब, अशुद्ध हवेचा सामना नागरिकांना करावा लागत आहे.

ऑक्टोबर ते जानेवारी या कालावधीत येथील हवेचा दर्जाही खालावला होता. २०२२ मध्ये स्वच्छता सर्वेक्षणात नवी मुंबई शहराने देशात तिसरा क्रमांक पटकावला असला तरी राष्ट्रीय वायू गुणवत्ता निर्देशांक-केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने संकेतस्थळावर जाहीर केलेल्या निर्देशांक मूल्यातून नवी मुंबईची हवा अति खराब असल्याचे जाहीर करण्यात आले होते. त्याचबरोबर नवी मुंबई शहरात मोठया प्रमाणावर विकास कामे सुरू आहेत. त्यामुळेही हवेत धुळीचे प्रमाण वाढत आहे. दरम्यान, खाणीसाठी पर्यावरणीय मंजुरी आवश्यक असल्याचे निर्देश राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने दिले आहेत. मात्र तरीही खारघरमधील खाणींना परवानगी कशी दिली जाते, असा सवाल पर्यावरणप्रेमींनी उपस्थित केला आहे. तसेच खाणीला पूर्वपरवानगी देण्यापूर्वी सखोल पर्यावरणीय परिणामांचे मूल्यांकन करणे अनिवार्य आहे, असे मत पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केले आहे. एकूण पार्श्वभूमी लक्षात घेऊन खारघरमधील खाणी तात्काळ बंद करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.



### गेल्या काही वर्षांत प्रदूषणात वाढ

गेल्या काही वर्षांपासून नवी मुंबई शहरात दिवसेंदिवस हवा प्रदुषण वाढत आहे. याबाबत महाराष्ट्र प्रदुषण मंडळाकडे वारंवार तक्रारी करण्यात आल्या आहेत. एमआयडीसीमधील औद्योगिक कंपन्या रासायन मिश्रित हवा कोणतीही प्रक्रिया न करता बाहेर सोडून दिली जाते. यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे.

# माध्यमिक शालांत परीक्षेत वाहोलीच्या अब्दुल कादिर जुवारी उर्दू हायस्कूलचे यश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा :** इयत्ता दहावीची परीक्षा नुकतीच पार पडली असून निकाल देखील जाहीर झाले आहेत. मोनीस एज्युकेशन अँड वेल्फेअर ट्रस्ट संचलित वाहोली येथील अब्दुल कादिर ज्वारी वाघोली उर्दू हायस्कूल या शाळेतील विद्यार्थ्यांनी या परीक्षेत चांगली कामगिरी केली असून विशेषतः मुलींनी







बाजी मारली आहे

यावर्षी अब्दुल कादिर जुवारी उर्दू हायस्कूल मध्ये ८८.६७% विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत

यापैकी शेख सीमाराणी नूरुल हसन ८५.८०% ,शेख सोमय्या इलियास ८५% , हाशमी अलफिया ८१.६०% , मुंडे जवेरीया फरहान ७९.४०% सरवले आयेशा मुबीन ७८.२०% , या सर्व विद्यार्थ्यांनी विशेष यश मिळवले शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत

# ३६ लाखांच्या मुद्देमालासह सराईत गुन्हेगारास अटक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत गेल्या काही महिन्यांपासून सोनसाखळी चोरी, वाहन चोरी, दरोडा आणि घरफोडी करणाऱ्या चार सराईत गुन्हेगारांना ठाणे गुन्हे अन्वेषण शाखेच्या कल्याण विभागाने अटक केली आहे. त्यांच्याकडून ३६ लाख रुपयांचा चोरी केलेला मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. वसीम युसुफ अली सय्यद उर्फ वसीम काला (३०), कौसर युसुफ अली जाफरी उर्फ बुशी (३३), शिवासिंग अमिरसिंग बावरी (२५) आणि पुनमकौर अमिरसिंग बावरी (३७) असे गुन्हेगारांची नावे आहेत. हे चौघेही कल्याणमधील रहिवाशी आहेत. या आरोपींनी ठाणे आणि नवी मुंबई क्षेत्रातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये घडलेल्या एकूण २९ गुन्ह्यांची कबुली दिली आहे.

# कांद्याचे दर आवाक्यात आल्याने गृहिणी खुश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** राज्यातील विविध बाजार समित्यांमध्ये कांद्याच्या दरात अलीकडे मोठी घसरण झाली असून ग्राहकांना दिलासा मिळाल्याचे चित्र असले तरी शेतकऱ्यांसाठी ही स्थिती हवालदिल करणारी ठरत आहे. वाढलेले उत्पादन, साठवणुकीतील मर्यादा आणि पुरवठा अधिक झाल्याने बाजारात कांद्याचे दर कोसळले असून, त्याचा थेट फटका शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर बसत आहे.

नाशिक, सोलापूर, अहमदनगर तसेच मध्य प्रदेशातून उन्हाळी कांद्याची मोठ्या प्रमाणावर आवक होत असल्याने एपीएमसी बाजारात



दर घसरले असून, सध्या कांदा किंटलमागे ८०० ते १७०० रुपयांच्या दरम्यान विकला जात आहे. काही भागांत उत्पादन खर्चही भरून निघत नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत.

'एका एकर कांद्याच्या उत्पादनासाठी ३० ते ३५ हजार रुपये खर्च येतो. मात्र बाजारभाव केवळ १००० ते १२०० रुपये क्विंटलमागे असल्याने तोट्याचे प्रमाण वाढत आहे,' अशी व्यथा शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. यामुळे अनेक शेतकरी कर्जबाजारी होण्याच्या वाटेवर आहेत.

केंद्र सरकारने १ एप्रिल २०२५ पासून कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क रद्द केल्यामुळे बाजारपेठेत सुधारणा होईल, अशी अपेक्षा होती. मात्र भारत-पाकिस्तानमधील तणावामुळे निर्यात बंदी व बांग्लादेशातील राजकीय अस्थिरतेमुळे निर्यातीत मोठी घट झाली आहे. परिणामी, दर स्थिर होण्याऐवजी आणखी घसरले आहेत.

नवी मुंबई एपीएमसी बाजारात दररोज १०० ते १५० गाड्यांद्वारे कांद्याची आवक होत असून, यामुळे चांगल्या प्रतीचा कांदा सध्या घाऊक बाजारात केवळ १० ते १५ रुपये किलो दराने विकला जात आहे. दोन महिन्यापूर्वी हेच दर ३५ ते ४० रुपये किलो होते. तर दुसऱ्या प्रतीचा कांदा १ ते ५ रुपये किलो या किमतीने विकला जात आहे.



# मीरा भाईदरमध्ये कंटेनर शाखांचा वाद

## शिवसेनेच्या नवीन कंटेनर शाखा शहरात दाखल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर :** - भाजप आणि शिवसेना यांच्यात सुरु असलेला कंटेनर वाद थांबण्याऐवजी अधिक चिघळण्याची चिन्हं आता स्पष्टपणे दिसू लागली आहेत. या वादाच्या पार्श्वभूमीवर, शिवसेनेचे नवीन कंटेनर मिरा भाईंदर शहरात दाखल झाले असून हा वाद पेटून उठण्याची शक्यता आहे.

मिरा भाईंदर शहरात रस्त्यांच्या कडेला व पदपथांवर शिवसेनेकडून कंटेनर उभारून पक्षाच्या शाखा सुरू करण्यात आल्या आहेत. गेल्या दोन वर्षांत अशा सुमारे १६ शाखा स्थापन करण्यात आल्या असून, या सर्वच शाखा अनधिकृत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. त्यामुळे अन्य राजकीय पक्षांकडून या अनधिकृत बांधकामांवर कारवाईची मागणी सातत्याने केली जात आहे. मात्र, राजकीय दबावामुळे महापालिका प्रशासन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप आहे.

या पार्श्वभूमीवर भाजपनेही विरोध दर्शवण्यासाठी म्हणून शहरात कंटेनर कार्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतला. विशेष म्हणजे, भाजपने महापालिका आयुक्त राधा बिनोद शर्मा यांच्या निवासस्थानाबाहेरच कंटेनर कार्यालय उभारून त्याचे उद्घाटन केले. त्यावर प्रतिक्रिया देताना आयुक्तांनी अनधिकृत कार्यालयांची यादी तयार करून लवकरच कारवाई केली जाईल, असे जाहीर केले होते. मात्र, तीन दिवस उलटूनही प्रत्यक्षात कोणतीही कारवाई न झाल्यामुळे प्रशासकीय भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दरम्यान, हा वाद थांबेल असे वाटत असतानाच गुरुवारी रात्री पुन्हा एकदा शिवसेनेचे नवीन कंटेनर शहरात दाखल झाले. मिळालेल्या माहितीनुसार, मिरा रोड येथील प्रभाग क्रमांक २० मध्ये नुकतेच शिवसेनेत प्रवेश केलेल्या अश्विन कसोदरिया यांना हे कंटेनर देण्यात आले असल्याचे समजते. मात्र, याबाबत बोलण्यास कसोदरिया यांनी नकार दिला आहे.

# भिवंडी मनपाच्या माध्यमिक विद्यालयांचा ७९.८७% निकाल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका अंतर्गत ४ मराठी माध्यम, ४ उर्दु माध्यम. २ तेलगु माध्यम तसेच १ हिंदी माध्यम याप्रमाणे एकुण ११ माध्यमिक विद्यालये सुरू असून महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांचेकडून मार्च-२०२५ मध्ये घेण्यात आलेल्या एस.एस.सी. परिक्षेकरीता एकुण ६५६ विद्यार्थी प्रत्यक्ष परीक्षेस बसले होते. त्यापैकी एकुण ५२४ विद्यार्थी एस.एस.सी. परिक्षेत उतीर्ण झाले आहेत. त्यापैकी एकुण 85 विदयार्थी प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाली आहे. महानगरपालिकेच्या ११ माध्यमिक विद्यालयांतील एस.एस.सी. परीक्षेच्या निकाल ७९.८७ % लागला आहे. त्यामध्ये तेलगु माध्यमाच्या विद्यार्थ्यांमध्ये कुमार चौटापेल्ली दिव्या श्रीनिवास याने ९२.२० गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवीला आहे.

उर्दु माध्यमाच्या विद्यार्थ्यांमध्ये कुमारी अन्सारी कुलस्म शफीक ७८.२० गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवीला आहे. मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांमध्ये कुमारी नुरीन मोहसीन शेख हिने ७७.२० गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवीला आहे.

माध्यमिक शालांत परीक्षे मध्ये उत्तीर्ण झालेले सर्व विद्यार्थ्यांना यशाच्या शिखरावर पोहचवीणाऱ्या महापालिका सर्व माध्यमिक विद्यालयातील मुख्याध्यापक, शिक्षक यांचे महापालिका प्रशासनाच्या वतीने प्रशासक तथा आयुक्त मा.अनमोल सागर, अतिरिक्त आयुक्त मा. देविदास पवार मा. अतिरिक्त आयुक्त श्री. विठ्ठल डाके, उप आयुक्त (मुख्यालय) श्री. विक्रम दराडे, उप आयुक्त (शिक्षण) श्री.बाळकृष्ण क्षिरसागर, सहा. आयुक्त (शिक्षण) श्रीम. अनुराधा वावर व प्र. प्रशासनाधिकारी श्री.स्नेहल पुण्यार्थी यांनी हार्दिक अभिनंदन केले आहे. आणि पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या, अशी माहिती महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाचे प्रभारी प्रशासनाधिकारी स्नेहल पुण्यार्थी यांनी दिली.



# वसई स्थानकात फलाट आणि लोकलमधील अंतर धोकादायक

## अपघाताच्या धोक्याने प्रवासी चिंतेत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई :** वसई रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक ४ आणि लोकल मधील अंतर प्रवाशांसाठी धोकादायक ठरू लागले आहे. या अंतरामुळे घाई घाईत चढ उतार करताना प्रवासी त्यात अडकून अपघाता होण्याची भीती प्रवाशांनी व्यक्त केली असून त्यावर रेल्वे प्रशासनाने योग्य ती उपाययोजना करावी अशी मागणी पुढे आली आहे.

पश्चिम रेल्वे वरील गजबजलेल्या रेल्वे स्थानकांपैकी एक स्थानक म्हणजे वसई रेल्वे स्थानक. रोज लाखो प्रवासी वसई ते विरार आणि चर्चगेट ते वसई असा प्रवास करतात. चर्चगेटहून विरारला जाणारी लोकल वसई स्थानकात फलाट क्रमांक २ किंवा मग फलाट क्रमांक ४ वर येऊन थांबते. पण, फलाट क्रमांक ४ आणि लोकलमधील अंतरामुळे इथे उतरणाऱ्या प्रवाशांना लोकलमधून उतरताना बरीच खबरदारी घ्यावी लागते. गर्दीच्यावेळी लोकलमध्ये चढण्याची गडबड सुरू असताना प्रवाशाचा पाय फलाट आणि लोकलच्या फटीत अडकून अपघात होण्याची शक्यता यामुळे संभवते. तसेच लांब पल्ल्याच्या गाड्या या फलाटावर थांबत असल्यामुळे इथे प्रवाशांची गर्दी असते. तसेच, अनेकदा स्वयंचलित जिन्यांनी पुलावर जाण्याकरता प्रवासी संपूर्ण फलाट ओलांडतात. यादरम्यान किंचित धक्काबुक्की झाल्यास ती गंभीर अपघाताचे कारण ठरू शकते.

# केडीएमसी मराठी शाळेचे दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कोव्हीड-19 च्या आपत्तीनंतर कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील गोरगरीब कुटुंबातील, कोव्हीडमुळे अनाथ झालेल्या मुला-मुलींच्या माध्यमिक शिक्षणाची सोय व्हावी यादृष्टीकोनातुन आयुक्तांच्या संकल्पनेतुन कल्याण डोंबिवली महानगरपालिकेची इयत्ता 9 वी व 10 वी चे वर्ग असलेली मराठी माध्यमाची माध्यमिक शाळा प्रबोधनकार ठाकरे शाळा क्रमांक 19 या प्राथमिक शाळेमध्ये सन 2022-23 पासून सुरु करण्यात आली आहे.

या शाळेमध्ये प्राथमिक शाळेतील विहीत शैक्षणिक पात्रता धारण करणारे होतकरु प्राथमिक शिक्षकांची प्रतिनियुक्ती करुन त्यांच्याकडे अध्यापनाची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. शैक्षणिक वर्ष 2023-24 मध्ये या शाळेचा पहील्या वर्षी इयत्ता 10 वी चा निकाल 84% लागला होता. सन 2024-25 या चालू वर्षी 27 पैकी 26 विद्यार्थी उत्तीर्ण होऊन हा निकाल 96% लागला आहे. या शाळेतील कशिश वाघमारे ही 80% गुण प्राप्त करुन प्रथम क्रमांकाने, तर मुस्कान शेख ही 78% गुण प्राप्त करुन दुस-या क्रमांकाने व करण नकाते 71% गुण प्राप्त तिस-या क्रमांकाने करुन उत्तीर्ण झालेले आहेत.

या शाळेतील शिक्षकांना उपायुक्त संजय जाधव, प्रशासन अधिकारी रमेश चव्हाण, शिक्षणाधिकारी विजय सरकटे यांनी सतत मार्गदर्शन केले त्यामुळे शिक्षकांच्या प्रयत्नांना यश आले आहे. या यशामध्ये विद्यार्थी, पालक व शाळेचे मुख्याध्यापक रविंद्र माळगावी, क्रीडा पर्यवेक्षक तथा सहशिक्षक प्रविण कांबळे, संतोष पाटील, दिलीप चेडे, कोमल माळी व योजना बारी यांचा मोठा हातभार लागलेला आहे.

या निकालामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांकडे पालकांचा व समाजाचा पाहण्याचा दृष्टीकोन बदलण्यास मदत झालेली आहे.

# माय-लेकीची हत्या करून बापानं संपवलं जीवन

## उल्हासनगरातील हृदयद्रावक घटनेने हळहळ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर:** ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगरमध्ये मन हेलावून टाकणारी घटना समोर आली आहे. इथं एका व्यक्तीने आपल्या पत्नी आणि मुलीची हत्या करून स्वत:ही आत्महत्या केली आहे. एकाच कुटुंबातील तिघांचा अशाप्रकारे मृत्यू झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू केला आहे.



पवन पाहुजा (५१), पत्नी नेहा पाहुजा (४८) आणि मुलगी रोशनी पाहुजा (१६) अशी मृतांची नावे आहेत. उल्हासनगरमधील बेवास चौक परिसरातील हर्षा कॉटेज बिल्डिंगमध्ये गुरुवारी सकाळी ही घटना घडली. सकाळी मयत पवनचा भाऊ त्याच्या घरी गेला. त्याने दाराची कडी वाजवली. मात्र आतून कुणीच प्रतिसाद दिला नाही. संशय आल्यानंतर त्यांनी दरवाजा तोडून आतमध्ये प्रवेश केला असता, घरात तिघांचेही मृतदेह आढळले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पवन पाहुजा हे उल्हासनगरमधील सोनार गल्ली परिसरात दागिन्यांच्या दुकानात काम करत होते. त्यांनी आधी आपली पत्नी आणि मुलीचा गळा दाबून हत्या केली. त्यानंतर स्वत:ही गळफास लावून घेतला. विशेष म्हणजे त्याच्या मुलीने नुकतीच दहावीची परीक्षा उत्तीर्ण केली होती. अशात पवनने मायलेकीची हत्या करत स्वत:ही आत्महत्या केली. व्यवसायात आर्थिक नुकसान झाल्यामुळे पवन नैराश्यात होता. याशिवाय, सहा महिन्यांपूर्वी त्यांच्या मुलाचे आजाराने निधन झाले होते. याच तणावातून पवनने हे टोकाचं पाऊल उचलल्याचं सांगितलं जातंय.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

https://x.com/@Jeevandeepvarta
https://www.facebook.com/jeevandeepnews
https://www.instagram.com/thane_jeevandeep
https://jeevandeepvarta.com





# शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने 'मोफत बालनाट्यप्रयोगां'चे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या आशिर्वादाने पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांच्या मार्गदर्शनाने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष कल्याण शहराच्या वतीने मे महिन्याच्या सुट्टीत बाळगोपाळांना काही क्षण आनंद मिळावा म्हणून विशेष "मोफत बालनाट्यप्रयोगां"चे आयोजन केले आहे. सदर बाल नाट्यप्रयोग हा फक्त इयत्ता चौथी ते आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठीच आहे. बुधवार दिनांक 28 मे रोजी सायंकाळी 4 वाजता कल्याण पश्चिमेतील आचार्य अत्रे रंगमंदिर याठिकाणी आयोजन करण्यात आले असल्याची माहिती पक्षाचे उपनेते विजय साळवी, शहर प्रमुख बाळा परब यांनी दिली. या कार्यक्रमाच्या प्रवेशिका शिवसेना शहर शाखा, छत्रपती शिवाजी महाराज चौक, कल्याण पश्चिम याठिकाणी उपलब्ध आहेत. संपर्क गुरूनाथ पानेरकर 9820559484

# मानिवली (बु) सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी भरत कराळे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील मानिवली (बु) येथील सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमन पदी चिंतामण वारघडे यांची बिनविरोध निवड झाली आहे तर , व्हाईस चेअरमन पदी भरत कराळे यांची सुद्धा बिनविरोध निवड झाली आहे.

निवड झाल्याबद्दल अभिनंदन केले व शुभेच्छा देताना सुभाष पवार ठाणे जिल्हा माजी उपाध्यक्ष तथा संचालक ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ली.

समवेत संचालक शंकर गोंधळी, मधुकर गोल्हे, मनोहर पानसरे, रमेश गोंधळी, बुधाजी खुणे, विकास वारघडे, बाळु कराळे, रघुनाथ वारघडे उपस्थित होते. नवनिर्वाचित चेअरमन/व्हाईस चेअरमन यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# वाहनचालक व रुग्णमित्रांच्या मागण्या मान्य करणार - आयुक्तांचे आश्वासन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील अत्यावश्यक सेवेतील कार्य बजावत असणारे महत्वाचे कर्मचारी त्यातील आरोग्य सेवक व १०८ वाहन चालक हे ही त्यांच्या बरोबरीनेच काम करत असताना शासन यांच्यावर दुर्लक्ष करत आहे. एकीकडे शासन सामान काम समान वेतन हे परिपत्रक काढत आहे तर दुसरीकडे कंपन्यांना ठेका देऊन तुटपुंज्या पगारावर काम करायला लावत आहे. आरोग्य विभागातील हे दोन घटक रुग्णासाठी अंतिमहत्वाचे काम बजावत आहेत. याघटकला आपल्या मागण्या मिळवण्यासाठी हे धरणे आंदोलन करावे लागत आहे.



१३मे २०२५ रोजी भारतीय ट्रेंड युनियन सीआयटीयु(C I T U) च्या मार्गदर्शनाखाली आरोग्य मित्र संघटना संलग्न सिटू व १०८ रुग्णवाहिका चालक युनियन महाराष्ट्र राज्य संलग्न सिटू यांच्या मार्फत आझाद मैदान येथे केलेल्या एकदिवसीय धरणे आंदोलनाची दखल आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर व एनएचएम (NHM) चे आयुक्त नितीन आंबार्डेकर व एमईएमएस (mems) १०८ च्या प्रकल्प इंचार्ज गोलाईत मॅडम यांनी घेतली त्याच्याबरोबर सिटू चे राष्ट्रीय उपाध्यक्ष व राज्याध्यक्ष माननीय डॉक्टर डी एल कराडकर साहेब व संघटनेचे पदाधिकारी अध्यक्ष नागनाथ नरळे, उपाध्यक्ष पाडूरंग ठोमके, महाराष्ट्र राज्य सचिव संदीप पष्टे, खजिनदार अमित मोरे, सदस्य प्रविण चव्हाण यांनी मागण्यांचे निवेदन देऊनआपल्या मागण्याबाबद सविस्तर चर्चा केली.

या विषयी शासनाची लीगल टीम, आयुक्त, सदर सेवेचे सेवा पुरवठादार यांची 15 दिवसात संयुक्त बैठक आरोग्य भवन मुबंई येथे लावून चालकांच्या समस्या सोडवण्यात येतील असे आयुक्त नितिन आंबाडेकर यांनी आश्वासन दिले आहे.

ही माहिती सर्व कर्मचाऱ्यांना समजतात सर्व संघटनेच्या वतीने डॉ. डी. एल. कराडकर व संघटनेचे पदाधिकारी सर्व सदस्य यांचे खूप खूप आभर मानले.




# पेण हायस्कुलचा निकाल ९७.२९ टक्के



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : पेण एज्युकेशन सोसायटी पेण येथील प्रायव्हेट हायस्कूल पेण चा एस.एस.सी. परीक्षेत फेब्रुवारी / मार्च २०२५ मध्ये बसलेल्या १४८ विद्यार्थ्यांपैकी १४४ विद्यार्थी पास होऊन शाळेचा निकाल ९७.२९टक्के लागला आहे.

या प्रशालेत उच्च श्रेणीत १९ प्रथम श्रेणीत ५० द्वितीय श्रेणीत ५१ तर तृतीय श्रेणीत २४ विद्यार्थी पास होऊन शाळेच्या नावलौकिकात भर घातली.

गुणानुक्रमे प्रथम आलेले पाच विदयार्थी प्रथम क्रमांक आर्यन अंकूश पाटील ४३९/५००(८७.८०) द्वितीय क्रमांक पार्थ राजकुमार घरत ४३२/५००

(८६.४०)तृतीय क्रमांक कुणाल दिनकर पाटील ४२९/५००(८५.८०)चतुर्थ क्रमांक स्वरूप कैलास भोईर४२६/५००

(८५.२०)पाचवा क्रमांक ओंकार विकास लांगी ४२५/५००(८५.००)असे गुण मिळवून यश संपादन केले आहे या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष ॲड मंगेश नेने कार्याध्यक्ष प्रशांत ओक उपकार्याध्यक्ष संजय कडू सेक्रेटरी सुधीर जोशी व सर्व संचालक मंडळ प्राचार्या सौ.अंजली जोशी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व पालकांनी अभिनंदन केले.

नियमित वाचा
दैं. ठाणे
जीवनदीप वार्ता

# एस.टी प्रशासनाचा MS-CIT च्या विद्यार्थ्यांना पास देण्यास नकार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : एसटी प्रशासनाने MSCIT व टायपिंग च्या विद्यार्थ्यांमध्ये भेदभाव करून टायपिंगच्या विद्यार्थ्यांना एसटीचा पास सढळहस्ते वाटून MSCIT च्या विद्यार्थ्यांना मात्र पास देण्यास नकार देऊन एसटी प्रशासनाने MSCIT च्या विद्यार्थ्यांना सावत्र वागणूक दिली आहे. एसटी प्रशासनाच्या या भूमिकेमुळे हजारो विद्यार्थ्यांना आर्थिक फटका बसला आहे. विद्यार्थी पासला 66.67% सवलत असते परंतु सध्या या विद्यार्थ्यांना एसटी चे पूर्ण टिकीट काढून प्रवास करावा लागत आहे.

शासनाने सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या संगणकीय ज्ञानाकरिता महाराष्ट्र स्टेट बोर्ड ऑफ टेक्निकल एज्युकेशन अंतर्गत MSCIT चे प्रशिक्षण राज्यभर सुरू केले आहे. MSCIT कोर्स शासन मान्य असल्याने या प्रशिक्षणाचा लाभ राज्यातील लाखो विद्यार्थी दरवर्षी घेत आहेत.केवळ रायगड जिल्ह्यात सन २०२३ मध्ये १७,७७३, सन २०२४ मध्ये १५,९५९ तर चालू वर्षी २०२५ मध्ये ९,६६९ विद्यार्थ्यांनी MSCITच्या कोर्सच्या सहाय्याने कॉम्प्युटरचे ज्ञान घेतले आहे. शासकीय नोकरी करिता हा कोर्स करणे केले असल्याने राज्यातील लाखो विद्यार्थी हा कोर्स दरवर्षी करतात.

पेण शहरात MSCIT चे प्रशिक्षण देणाऱ्या ६ संस्था आहेत. या संस्थांमध्ये तालुक्यातील हजारो विद्यार्थी संगणकीय MSCIT कोर्स शिकण्याकरता येतात. परंतु पेण एसटी डेपो अधिकाऱ्यांनी व पेण रामवाडी येथील रायगड विभागीय कार्यालयतील अधिकाऱ्यांनी शासनाच्या परिपत्रकाचा चुकीचा अर्थ लावून एसटी प्रशासनाने MSCIT च्या हजारो विद्यार्थ्यांना ठेवले पास पासून वंचित ठेवले आहे. शासन निर्णय क्रमांक एसटीसी -१०१७/ प्र. क्र. ५२५/परि-१ दिनांक ९ ऑक्टोबर २०१८ नुसार १९८६ पुर्वी १९८६ नंतर तंत्र व व्यावसायिक शिक्षणा अंतर्गत सुरू झालेले विविध अभ्यासक्रमात शिक्षण घेणारे विद्यार्थीना एसटीचा विद्यार्थी पास देण्याची मान्यता देण्यात आली आहे. असे असताना देखील पेण शहरातील काही टायपिंग संस्थांनी पेण एसटी स्थानकात तक्रार अर्ज देऊन MSCIT विद्यार्थ्यांचे पास बंद करायला लावले. MSCIT च्या विद्यार्थ्यांना कॉम्प्युटरचे ज्ञान देताना कॉम्प्युटर टायपिंग शिकवलीच जाते. त्यामुळे केवळ टायपिंग शिकण्याकडे विद्यार्थ्यांचा कल कमी झाला आहे.



MSCIT च्या विद्यार्थ्यांचे सवलत पास बंद केल्यानंतर त्यांनी एसटीचा ३ महिन्याचा पास काढून प्रवास करावा असा अजब सल्ला पेण एसटी स्थानकाचे डेपो मॅनेजर अपर्णा वर्तक यांनी दिला आहे.

सदरच्या परिपत्रकानुसार केवळ आयटीआय चे शिक्षण घेणारे विद्यार्थी आणि व टायपिंग सारखे तांत्रिक प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाच हा पास द्यायचा आहे असा शासन परिपत्रकाचा आजब अर्थ लावून रायगड विभाग नियंत्रक दीपक घोडे यांनी MSCIT च्या विद्यार्थ्यांना पास न देण्याचा पवित्रा घेतला आहे.

विद्यार्थ्यांना सवलत पास दिल्यावर ६ किलोमीटरच्या प्रवासच्या महीन्याच्या पास करीता विद्यार्थीना केवळ १० दिवसांचे भाडे आकारून रू. २२० ला पास दिला जातो. ३ महिन्याला विद्यार्थ्यांना पास करिता ६६० रुपये लागतात. तर ह्याच प्रवासा करीता तीन महिन्याचे एसटीचा रेगुलर पास काढला तर ११०० रुपये भरावे लागतात. त्यामुळे गोरगरीब विद्यार्थ्यांना ४४० रुपयांचा आर्थिक फटका बसत आहे. प्रवासाची किलोमीटर वाढल्यानंतर आर्थिक फटकाही वाढत जात आहे.

# मानिवली गावात वीज वाहिनीचा शॉक लागून म्हशीचा मृत्यू

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महापालिकेच्या टिटवाळा परिसरातील उंबार्णी भागात मोठ्या प्रमाणात बैट्या चाळिंचे बांधकाम सुरू आहे, या चाळिंना विद्यूत वितरण कंपनीने लाईट चे कनेक्शन दिले आहे, परंतु हे कनेक्शन शेतातून जमीनीलगत दिल्याने व त्यांचे जाँईड जागोजागी उघडे ठेवल्याने याचा शाँक दुपत्या म्हशीला लागून तिचा आज सकाळी मृत्यू झाला. त्यामुळे मानिवली गावचे शेतकरी रुपेश नारायण गायकर यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे, त्यामुळे या अनाधिकृत चाळी बांधणाऱ्या बिल्डर वर कारवाई करावी अशी मागणी त्यांनी केली आहे. टिटवाळया जवळील उबांर्णी, बल्याणी परिसरात सध्या मोकळ्या जागेवर मोठ्या प्रमाणावर चाळिंचे बांधकाम सुरू आहे, सर्व नियम, अटी, शर्ती, धाब्यावर बसवून हे प्रकार सुरू आहेत. अशाच चाळी मानिवली गावाच्या शेजारी व उंबार्णी हद्दीत बांधणे सुरू आहे, काही रुममध्ये लोक रहायला देखील आले आहेत, या चाळिंना हजार, पाचशे मिटर अंतरावरुन वायर टाकून लाईट कनेक्शन देण्यात आले आहे. हे शेतजमिनीला लागून असून अनेक ठिकाणी हे जाँईड उघडेच आहेत, मानिवली गावचे शेतकरी निलेश नारायण गायकर यांनी सकाळी आपल्या८/९म्हशी चरण्यासाठी शेतात सोडल्या, यातील एका दुबत्या म्हशीला या वायरचा शाँक लागला व ती जागीच मेली, तिला वाचवण्यासाठी निलेश गेला मात्र त्याला देखील जोराचा धक्का बसला, तो वाचला, विशेष म्हणजे, पावसाळ्यात येथे शेतकरी व इतर लोक शेतावर येथील, त्यांना जर शाँक लागला तर किती भयानक परिस्थिती निर्माण होईल, यांना लाईट कनेक्शन देतांना विद्यूत मंडळाने काय कागदपत्रे पाहिली हे त्यांनाच ठाऊक?शिवाय येथील सर्व सांडपाणी हे मोहिली जवळच्या केंडिएमसीच्या शुध्दीकरण पंपाजवळ सोडले आहे, त्यामुळे उल्हास नदी प्रदूषित होते ते वेगळेच?हा शेतकरी या बाबतीत तक्रार दाखल करण्यासाठी टिटवाळा पोलीस ठाण्यात गेला असता त्याची तक्रार नोंदवली नाही, यावरून बिल्डर ची कशी जादू आहे ते लक्षात येते. तसेच पशुसंवर्धन अधिकारी देखील अद्याप जागेवर गेले नाहीत, त्यामुळे शेतकऱ्यांला कोणी वाली उरला आहे का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. त्यामुळे शासनाने केवळ१००दिवसासाठीच ७कलमी कार्यक्रम आयोजित केला होता का?आता पुढे काय?कि येरे माझ्या मागल्या?अशी अवस्था होणार असा सवाल शेतकरी रुपेश गायकर यांनी उपस्थित केला आहे. पण आपण शांत बसणार नाही, या विरोधात, केडिएमसी, विद्यूत मंडळ, आणि पोलीस ठाण्यात तक्रार करणार असल्याचे त्यांनी सांगितले.



## वसईच्या ग्रामीण भागातील
# पाणी प्रश्न सोडवण्यासाठी आ. स्नेहा दुबेंचा पुढाकार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामिण : वसई ग्रामीण भागातील घरांच्या पाणी प्रश्न सोडवण्यासाठी आमदार स्नेहा दुबे (पंडित) यांनी पुढाकार घेतला असून यासंदर्भात पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांच्या सोबत उच्चस्तरीय बैठक घेण्यात आली.

वसईच्या ग्रामीण भागातील घरांना पाणीपुरवठा करण्यासाठी शासनाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत विविध योजना हाती घेतल्या आहेत. यामध्ये अर्नाळा किल्ला आणि 7 गावे, अर्नाळा गाव व 16 गावे तसेच तिल्हेर गाव व 12 गावे अशा तीन योजनांचा समावेश आहे. या तीन योजनांना सन 2008 मध्ये शासनाने मंजूरी दिली होती. मात्र त्यावर कोट्यावधी रुपयांचा खर्च करूनही या योजना पूर्णत्वास गेल्या नाहीत. त्यानंतर शासनाने पुन्हा सन 2022 मध्ये या योजनांना नव्याने मंजूरी देऊन त्याप्रमाणे कार्यादेश देण्यात आले. मात्र निविदेनुसार विहीत कालावधी पूर्ण होऊनही या योजनांची कामे पूर्ण झालेली नाहीत.




सदर, याबाबत स्थानिक आमदार स्नेहा दुबे (पंडित) यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व जिल्हा परिषद पालघर तसेच वसई-विरार शहर महानगर पालिकेच्या अधिकाऱ्यांसोबत यापूर्वी तीन बैठका घेऊन या बैठकांदरम्यान निदर्शनास आलेल्या बाबी शासनाच्या निदर्शनास आणून त्यावर तातडीने कार्यवाही करावी व या वर्ष अखेरपर्यंत कोणत्याही परिस्थितीत सर्व गावांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरू व्हावा यासाठी राज्याचे पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक मंत्रालयात आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीमध्ये आमदार स्नेहा दुबे पंडित यांनी मागील कित्येक वर्षापासून रखडलेल्या या योजनांची तपशीलवार आकडेवारीसह माहिती सादर करून या प्रकरणी शासनाने लक्ष घालून योग्य ते आदेश देण्याची विनंती केली तर याबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेतल्यानंतर सर्व अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करण्याचे तसेच एमएमआरडीच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन पाणी पुरवठ्याच्या मुख्य जलवाहिनीवर टॅपिंग करण्याची कार्यवाही त्वरेने पूर्ण करण्याच्या सूचना पाणी पुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी अधिकाऱ्यांना देऊन या योजनांची कामे गुणवत्तापूर्ण असतील यासाठी स्वतंत्र यंत्रणेमार्फत त्याची तपासणी करून घेण्याचेही आदेशित केले असल्याचे आमदार स्नेहा दुबे पंडित यांच्या वसई पश्चिम जनसंपर्क कार्यालयीन दिलेल्या प्रसिद्धी माध्यमाद्वारे म्हटले आहे.

## त्रैवार्षिक गावदेवी यात्रा ठाकुर्ली, चोळेगाव महोत्सवानिमित्त
# विविध कार्यक्रमांचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : ठाकुर्ली चोळेगाव त्रैवार्षिक गावदेवी महोत्सव मोठ्या थाटामाटात संपन्न झाला.

देवीच्या दर्शनासाठी ठाकुर्ली चोळेगाव, डोंबिवली आणि परिसरातील अनेक गावातील भाविकांनी देवीचे दर्शन घेतले.

या त्रैवार्षिक गावदेवी महोत्सवात विविध आयोजन करण्यात आले होते त्यामध्ये लोकप्रिय खेळ म्हणजे जंगी कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले होते करण्यात आले होते . कुस्ती हे पाहण्यासाठी गावागावातून कुस्ती प्रिय लोकांनी गर्दी केली होती. कल्याण ग्रामीणचे लोकप्रिय आमदार माननीय राजेश गोवर्धन मोरे, महेश गायकवाड या कार्यक्रमाला उपस्थित होते. त्याचप्रमाणे अनेक मान्यवरांचे या कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या.



उद्योजक ,समाजसेवक दिनेश कृष्णा पाटील यांच्या स्वखर्चाने दरवर्षी आयोजित होणाऱ्या या कुस्ती महोत्सवात लाखो रुपयांची बक्षीसे ठेवण्यात आले होते. ज्यामुळे राज्यभरातील नामांकित मल्लांनी सहभाग घेतला संस्कृती परंपरा जतन करत युवकांना क्रीडा कला सुद्धा प्रोत्साहन मिळावे या मागचा उद्देश. लोकसहभागाकडून आणि पाहुण्यांच्या उपस्थिती महोत्सव सालाबाजाप्रमाणे यावर्षी सुद्धा भव्यदिव्य स्वरूपात साजरा करण्यात आला.

# तरुणांमध्ये वाढत्या उच्च रक्तदाबाची समस्या
## तणाव आणि मोबाईलचा अति वापर मुख्य कारण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : बदलती जीवनशैली, कामाचा वाढता ताण, धुम्रपान आणि दारूचे सेवन यामुळे सध्या २२ ते ३० वयोगटातील २५% तरुणांमध्ये उच्च रक्तदाबाची समस्या दिसून येत आहे. उच्च रक्तदाबासारख्या समस्येचे वेळीच व्यवस्थापन करणे गरजेचं आहे. उच्च रक्तदाबामुळे तरुणांमध्ये कमी वयात स्ट्रोक, हृदयविकार आणि मूत्रपिंडाशी संबंधीत समस्या होण्याचा धोका अधिक असतो. त्यामुळे उच्च रक्तदाबाची पातळी संतुलित ठेवण्यासाठी नियमित चाचणी, संतुलित आहार, व्यायाम करण गरजेचं आहे. जेणेकरून भविष्यात या समस्या टाळता येऊ शकतात.

जेव्हा रक्तवाहिन्यांच्या भिंतींवर रक्ताचा दाब खूप जास्त असतो तेव्हा त्यास उच्च रक्तदाब म्हणून ओळखले जाते. हे बऱ्याचदा कोणत्याही लक्षणांशिवाय विकसित होते, म्हणूनच त्याला "सायलेंट किलर" म्हणून संबोधले जाते. डोकेदुखी, चक्कर येणे, अंधुक दृष्टी, छातीत दुखणे किंवा थकवा ही उच्च रक्तदाबाची लक्षणे आहेत. परंतु, उच्च रक्तदाबाबद्दल पुरेशी माहिती नसल्याने या आजाराचे पटकन निदान होत नाही. वेळीच निदान न झाल्यानं गुतांगुत वाढते. परंतु, सध्या तरूणांमध्ये उच्च रक्तदाबाच्या प्रकरणांमध्ये मोठ्या संख्येने वाढ होत आहे. ही अत्यंत चिंतेची बाब आहे.

लीलावती रूग्णालयातील इंटरनल मेडिसिन एक्सपर्ट डॉ. सी. सी. नायर म्हणाले की, तणाव, करिअरची संबंधीत वाढती स्पर्धा आणि वैयक्तिक आव्हानं, धूम्रपान आणि मद्यपानासारख्या सवयींसह तरुणांमध्ये उच्च रक्तदाबाच्या समस्या वाढत आहेत. त्याहूनही एक चिंताजनक बाब म्हणजे उच्च रक्तदाब असलेल्या अनेक तरूणांमध्ये कोणतीही लक्षणे दिसत नाहीत. यामुळे नियमित तपासणी करणे गरजेचे आहे. जर रक्तदाब नियंत्रणात ठेवला नाही तर, कालांतराने तो इतर अवयवांवर परिणाम करु शकतो. तरुणांमधील उच्च रक्तदाबाची समस्या ही हृदयरोग, स्ट्रोक, दृष्टी कमजोर होणे आणि मूत्रपिंड निकामी होऊ शकतो. रूग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या दर महिन्याला १० पैकी ८ तरूण रूग्णांना ताणतणाव किंवा धूम्रपानामुळे उच्च रक्तदाबाची समस्या असल्याचं आढळून येत आहे. उच्च रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यासाठी मीठाचे सेवन मर्यादित करणे, प्रक्रिया केलेले अन्नपदार्थ टाळणे, धूम्रपान तसेच मद्यपानाचे व्यसन सोडणे, नियमित व्यायाम करणे आणि योगा आणि मेडिटेशन सारख्या पर्यायाने तणावाचे व्यवस्थापित करणे गरजेचे आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024